# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन


ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०३/०६/२०२५

## जिल्हा : सोलापूर

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०३/०६/२०२५ ते ०७/०६/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| पाऊस (मिमी) | १ | १ | ६ | ७ | ४ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३५ | ३५ | ३६ | ३७ | ३६ |
| किमान तापमान (अं.से.) | २४ | २४ | २५ | २५ | २५ |
| ढग स्थिती (आकाश) | ४ | २ | ४ | २ | ४ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९१ | ८८ | ८७ | ८२ | ८४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६२ | ५७ | ५६ | ५३ | ५५ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १९ | १८ | १६ | १६ | १६ |
| वाऱ्याची दिशा (अंश) | २४२ | २५८ | २७१ | २९० | २९१ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०३, ०४ व ०७ जून, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी तसेच दिनांक ०५ व ०६ जून, २०२५ रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०१ ते ०७ जून, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पावसाची शक्यता असल्याने फळ बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>• पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी, तसेच उघड्यावरील धान्य ताडपत्रीने झाकून ठेवावे.<br>• पावसानंतर बागेत, शेतात, बांधावर पडलेला काडीकचरा, फळे, पाने, फांद्या वेचून बाग स्वच्छ करावी व खत करण्यासाठी वापरावे. पावसानंतर शेतातील उभ्या पिकाची पड झाली असल्यास पीक बांधणी करावी.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून, जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात. |

| | | |
|---|---|---|
| | | • शेतकरी बंधूनी, हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानाचा पूर्वानुमाना करिता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• पाण्याचे पूर्नभरण : पाणी जमिनीत जास्तीत मुरेल व वाहून जाणार नाही याचा प्रयत्न करावा. पावसाचे घराच्या छतावर पडणारे पाणी पाइपद्वारे एखाद्या टाकीत जमा करावे व त्याचा वापर विहिर पुर्नभरण किंवा बोअरवेल पूर्नभरण करण्यासाठी वापरावे. |
| खरीप पिक नियोजन | | सध्या वापसा येण्यास वेळ लागण्याची शक्यता असल्याने शेतकरी बंधूंनी पेरणीची घाई करू नये. शेतामध्ये पावसाचे पाणी साठून राहणार नाही यासाठी व अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी शेतातून पाणी बाहेर काढण्याची व्यवस्था करावी. वापसा आल्यानंतर कुळवाने मशागत करावी म्हणजे उगवलेल्या ताणाचा बंदोबस्त होईल व शेत पेरणी योग्य होईल. खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. पिकाच्या आवश्यकतेनुसार जमिनीची निवड व पीक निहाय पूर्व मशागतीची कामे पूर्ण करावी.<br>कोरडवाहू पिके<br>हलक्या जमिनीत वापसा आल्यानंतर कुळवाने पूर्व मशागत करून बियाण्यास फुले सुपर बायोमिक्सची बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी.<br>कोरडवाहू भागात ज्या ठिकाणी जमिनीची पूर्व मशागत झालेली असल्यास आणि पेरणी योग्य १०० मी मी पेक्षा जास्त पाऊस झाला आहे अशा ठिकाणी वापसा आल्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे खाली नमूद केल्या प्रमाणे पेरणी करावी.<br>हलकी जमीन : हुलगा, मटकी<br>मध्यम व भारी जमीन : उडीद, मूग, चवळी, सूर्यफूल, तूर<br>आंतरपिक पद्धत:<br>येत्या कालावधी मधील पावसाची अनिश्चितता लक्षात घेता, कोरडवाहू विभागामध्ये तूर + सूर्यफूल (२:१), तूर + बाजरी (२:१), तूर + मूग / उडीद (२:१) आंतरपीक पद्धतीचा अवलंब फायदेशीर ठरू शकेल. |
| कपाशी | | जमीनीतील तापमान कमी झालेले नसतानाही लागवड केल्यास कीड व रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते, त्यामुळे जमीनीतील तापमान कमी झाल्याशिवाय लागवडीची घाई करू नये. |
| ऊस | पिक वाढीची अवस्था | ऊस पिकातील खोडकिडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) चार प्रती एकर तसेच कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) प्रती हेक्टरी ५ वापरावेत. प्रादुर्भावग्रस्त झालेली रोपे जमिनीलगत कापावीत आणि नष्ट करावीत. हुमणी आळीच्या भुंग्याचा वावर हा प्रामुख्याने संध्याकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान असतो. त्याकरीता एकरी एक प्रकाश सापळा संध्याकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान लावावा. बांधाच्या कडेला असलेल्या लिंब आणि बाभळीच्या झाडांवर हुमणीचे भुंगे जास्त प्रमाणात आढळतात तरी सामूहिकरीत्या ते गोळा करून नष्ट करावेत. जमिनीत शेणखत टाकण्यापूर्वी त्यामध्ये ०१ किलो मेटारायझीयम बुरशी मिसळावी. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| द्राक्ष | पीक वाढीची अवस्था | पावसाची शक्यता असल्याने खरड छाटणी झालेल्या बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. पाऊसमान व ढगाळ वातावरणामुळे करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बनडॅन्झीम ५० डब्लू.पी., १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| आंबा | काढणी पूर्ण अवस्था | ज्या बागेतील फळ काढणी पूर्ण झाली असेल त्या बागेत हलकी छाटणी करून घ्यावी. तसेच कॉपर ऑक्झीक्लोराईड २० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात पाऊस नसताना फवारणी करावी. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रित पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे. कोवळ्या गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळ्याचा वापर करावा. जनावरांना मोकळ्या जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्यावतीने विकसित करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळ (**Phule Amrutkal App**) या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) लोकार्पण झाले असून, आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ ॲप डाउनलोड (**Phule Amrutkal App Download**) केल्याने होणारे फायदे : फुले अमृतकाळ या ॲपच्याद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी, गोठ्यातील तापमान घटविण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे, योग्य वायु विजन राखणे, पिण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे, फॅन किंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलीत पद्धतीने सुरू करणे तसेच संतुलित आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : -
ठिकाण : कृ.म.वि., पुणे.
दि. : ०३.०६.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**